

श्री. नरेंद्र मोदी
मा. प्रधानमंत्री,
भारत सरकार



श्री. अमित शाह
मा. केंद्रीय मंत्री, गृह व सहकार मंत्रालय,
भारत सरकार

सत्यमेव जयते

प्रधान मंत्री आवास योजना-ग्रामीण
Pradhan Mantri Awaas Yojana-Gramin

महाराष्ट्र शासन



श्री. अजित पवार
मा. उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

श्री. एकनाथ शिंदे
मा. उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

श्री. देवेंद्र फडणवीस
मा. मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य

## ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण

# महा आवास अभियान २०२४-२५

दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते १० एप्रिल, २०२५

# "अभियान पुस्तिका"







श्री. योगेश कदम
मा. राज्यमंत्री,
ग्राम विकास व पंचायत राज

श्री. जयकुमार गोरे
मा. मंत्री,
ग्राम विकास व पंचायत राज

@MAHAAWAAS www.mahaawaas.org




मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १०० दिवसाच्या विशेष कार्यक्रमांतर्गत ग्रामविकास विभागातील सर्व योजनांच्या आढावा बैठकी प्रसंगी मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे



मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या शुभहस्ते व मा.उप मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.अजित पवार, मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.जयकुमार गोरे आणि विभागाचे मा.राज्यमंत्री, मा.मुख्य सचिव, मा.प्रधान सचिव व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास त्रैमासिकाचे प्रकाशन




मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली व मा. प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग श्री.एकनाथ डवले यांच्या प्रमुख उपस्थितीत ग्राम विकास विभागांतर्गत विविध योजनांच्या आढावा बैठका प्रसंगी उपस्थित अधिकारी




मा. मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज, श्री. जयकुमार गोरे यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत सातारा येथे महा आवास अभियान २०२४-२५ जिल्हास्तरीय कार्यशाळा शुभारंभ

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# ग्राम विकास व पंचायत राज विभाग

## संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय

# अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| मार्गदर्शक | श्री. एकनाथ डवले, भा.प्र.से.<br>प्रधान सचिव,<br>ग्राम विकास व पंचायत राज विभाग |
| मुख्य संपादक | डॉ. राजाराम दिघे<br>संचालक,<br>ग्रामीण गृहनिर्माण, महाराष्ट्र राज्य |
| प्रबंध संपादक | नीलेश काळे, उप संचालक<br>राजलक्ष्मी येरपुडे, उप संचालक<br>सुनिल मोरे, सहा. संचालक (लेखा)<br>अपर्णा पाटणे, सहा. संचालक (लेखा) |
| कार्यकारी संपादक | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| सहयोगी संपादक | डॉ. संघरत्न सोनवणे<br>राम आघाव<br>परमेश्वर शेलार |
| मुख्यपृष्ठ मांडणी व सजावट | दिनेश मोवळे,<br>राज्य माहिती, शिक्षण व संवाद तज्ञ |
| संपादकीय पत्ता | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-<br>ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय<br>४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन,<br>सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४ |
| संकेत स्थळ | www.pmayg.nic.in<br>www.mahaawaas.org |
| ईमेल | directoriayruralhousing@gmail.com |
| दूरध्वनी क्रमांक | ०२२ - २७५६१८२४ |


| अ. क्र. | तपशिल | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | राज्य व्यवस्थापन कक्षाची भुमिका व कार्ये | १ |
| २ | महा आवास अभियान २०२४-२५ प्रस्तावना | ३ |
| ३ | अभियान राबविण्याचे उद्देश्ये व उपक्रम | ४ |
| ४ | अभियान क्षमता बांधणी कार्यक्रम | ७ |
| ५ | अभियान माहिती, शिक्षण व संवाद कार्यक्रम | ९ |
| ६ | प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन | १० |
| ७ | अभियानातील उत्कृष्ट कार्याचा गौरव | १२ |
| ८ | अभियानात राबविलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन | १४ |
| ९ | परिशिष्ट अ | १५ |
| १० | परिशिष्ट ब | २० |
| ११ | ग्रामीण गृहनिर्माण योजनांची माहिती | २१ |
| १२ | विभागनिहाय घरकुल, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंट, इ. चे डिझाईन्स | ३२ |
| १३ | प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या जागेच्या समस्या सोडविण्यासाठीचे नावीन्यपूर्ण उपक्रम | ३३ |
| १४ | प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या जागेच्या समस्या सोडविण्यासाठीचे नावीन्यपूर्ण उपक्रम | ३४ |

# राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माणची भूमिका

ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक: २०१५/प्र.क्र.२४०/ योजना-१०, दिनांक १६ जुलै, २०१५ अन्वये राज्याच्या ३४ जिल्ह्यात इंदिरा आवास योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच इतर विभागाच्या उदा. सामाजिक न्याय, आदिवासी विकास, कामगार, ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाशी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत समन्वय ठेवणे व केंद्र शासनाशी अंमलबजावणी संदर्भातील विषयाबाबत समन्वय करणेसाठी राज्य व्यवस्थापन कक्ष- इंदिरा आवास योजना (State Management Unit – Indira Awas Yojana) ची स्थापना झाली. तदनंतर ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय क्रमांक: २०१५/प्र.क्र.४१३/योजना-१०, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१६ अन्वये राज्यातील ग्रामीण गृहनिर्माण घरकुल योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी व संनियंत्रण करण्यासाठी या कार्यालयाची व्याप्ती वाढवून राज्य व्यवस्थापन कक्ष – ग्रामीण गृहनिर्माण (State Management Unit - Rural Housing) कक्षात रुपातरीत करण्यात आले.

"सर्वांसाठी घरे" हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्वीकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान बरोबरच रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना,यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजना अभियान स्वरुपात राबविण्यात येत आहेत. याच बरोबर पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना या माध्यमातून घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्याला जागा खरेदीसाठी अर्थसहाय्य करण्यात येते. तसेच घरकुल बांधकामासाठी शासकीय जागा विनामुल्य उपलब्ध करणे व ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करणे या योजनाही राबविण्यात येत आहेत.

ग्रामीण गृहनिर्माण योजना राज्य व्यवस्थापन कक्ष– ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून यशस्वीरीत्या राबविण्यात येत आहेत. केंद्र पुरस्कृत योजनेसाठी ६०% केंद्र हिस्सा ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार तसेच राज्याचा ४०% राज्य समरुप हिस्सा अनुक्रमे सर्वसाधारण प्रवर्गासाठी ग्राम विकास विभाग, अनुसूचित जाती प्रवर्गासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग आणि अनुसूचित जमाती प्रवर्गासाठीचा आदिवासी विकास विभाग यांचेकडून प्राप्त करुन घेण्यात येतो. त्याचप्रमाणे विविध राज्य पुरस्कृत योजनांचे अनुदान राज्य शासनाच्या संबंधित विभागांकडून प्राप्त करुन घेण्यात येते. सदर अनुदान संबंधित योजनांच्या स्टेट नोडल खात्यात जमा करुन तालुकास्तरावरुन लाभार्थ्यांना नियमानुसार टप्पा निहाय आवाससॉफ्ट /PFMS प्रणालीमधून थेट बँक खाती निधी वितरीत केला जातो.

## -: राज्य व्यवस्थापन कक्षाची महत्वाची कार्ये :-

**१. संनियंत्रण आणि मूल्यमापन** :- राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तरावर तसेच गावपातळीवर देखील आढावा बैठका घेऊन केलेल्या कार्याचे संनियंत्रण आणि मूल्यमापन करण्यात येते.

**२. समन्वय :-** राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालय योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी तसेच इतर विभागाच्या उदा. सामाजिक न्याय, आदिवासी, कामगार, ग्रामीण गृहनिर्माण विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाशी कार्यक्रमाच्या अंमलबजावणीबाबत समन्वय ठेवणे व केंद्र शासनाशी अंमलबजावणी संदर्भातील विषयाबाबत समन्वय ठेवणेबाबत कार्य करते.

**३. क्षमता बांधणी :-** क्षमता बांधणीसाठी राज्य व्यवस्थापन कक्षाकडून विविध स्तरावर ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील संबंधित बैठका, कार्यशाळा, प्रशिक्षण सत्रांचे आयोजन करते.

**४. माहिती शिक्षण व संवाद :-** ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित माहिती, शिक्षण व संवाद यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येतात. उदा. विविध मेळावे, मोहिमा, दूरदर्शन, महा आवास त्रैमासिक, समाज माध्यम तसेच खाजगी दूरचित्रवाहीन्यांवर मुलाखती, वृत्तपत्रामध्ये जाहीराती, पोस्टर, भिंतीपत्रके, होर्डिंग/बॅनर, इत्यादी उपक्रम राबवत आहे.

**५. केंद्र व राज्य सरकार यांना ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रासंबंधित पॉलिसी इनपूट देणे :-** ग्रामीण गृहनिर्माण योजना संदर्भात येणाऱ्या अडचणींचा अभ्यास करुन तसेच योजना अधिक कार्यक्षमपणे राबविण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाकडून विविध प्रस्ताव सादर करण्यात येतात व त्यानुसार धोरणात्मक निर्णय केंद्र व राज्य शासनाकडून घेण्यात येतात.

उदा. राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाने राज्यात राबविण्यात येणाऱ्या केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत विविध ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामामध्ये गतिमानता व गुणवत्तावाढीसाठी **राज्यात दरवर्षी दिनांक २० नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून** महा आवास अभियान राबविण्यात येते. या आर्थिक वर्षामध्ये देखील "**महा आवास अभियान २०२४-२५**" राबविण्यात येत आहे.

त्यानुसार “सर्वांसाठी घरे” या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी महाराष्ट्र राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत “महा आवास अभियान २०२४-२५” राबविण्यात येत आहे.

"**महा आवास अभियान २०२४-२५**" या अभियानाचे उद्देश्ये, राबविण्यात येणारे उपक्रम, क्षमता बांधणी, संनियंत्रण व मूल्यमापन, माहिती, शिक्षण व संवाद, इ. उपक्रम, अभियान कालावधीत उत्कृष्ट काम करणारे व्यक्ती किंवा संस्था यांना प्रदान करावयाचे पुरस्कार, पुरस्कार निवडीचे निकष व पुरस्कार वितरण, विविध ग्रामीण गृहनिर्माण योजना इ. बाबत सर्व भागधारक, लाभार्थी व लोक यांना मार्गदर्शनासाठी "अभियान पुस्तिका" राज्य व्यवस्थापन कक्ष प्रकाशित करत आहे.

# महा आवास अभियान २०२४-२५

ग्राम विकास व पंचायत राज विभाग, महाराष्ट्र शासन यांचे शासन निर्णय दिनांक ०१ जानेवारी, २०२५ अन्वये महाराष्ट्र राज्यात दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या कालावधीत "**महा आवास अभियान २०२४-२५**" राबविणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. "सर्वांसाठी घरे" या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी अधिक गतीमान करणे व गुणवत्ता आणने हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. त्यानुसार या अभियानामध्ये राज्यस्तरावरुन तसेच क्षेत्रीय पातळीवरुन संनियंत्रण व मुल्यमापन करण्यासाठी खालीलप्रमाणे अभियान माहिती निर्गमित करण्यात येत आहे.

**प्रस्तावना :-**

“सर्वांसाठी घरे” हे केंद्र शासनाचे महत्वाचे धोरण असून राज्य शासनाने देखील या धोरणाचा स्विकार केला आहे. या अनुषंगाने राज्यात राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाच्या माध्यमातून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान तसेच राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या ग्रामीण गृहनिर्माण योजनासह पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना व ग्रामीण भागातील अतिक्रमण नियमानुकूल करणे अशा विविध योजना राबविण्यात येत आहेत.

संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास ध्येये (Sustainable Development Goals) मधील ध्येय क्रमांक ११ नुसार किफायतशीर गृहनिर्माण (Affordable Housing) क्षेत्रात काम झाल्यास एकूण १७ SDG पैकी किमान १४ SDG वर सकारात्मक प्रभाव पडणार आहे. यासाठी घरकुलांच्या कामाची प्रगती फक्त संख्यात्मक न राहता गुणात्मक राहावी, नाविण्यपूर्ण कल्पना अंमलात आणून लाभार्थ्यांना सर्व सुविधायुक्त असे घरकुले उपलब्ध करुन द्यावीत, तसेच नैसर्गिक आपत्ती प्रतिरोधक घरकुले बांधण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा असे शासनाचे ध्येय आहे.

**राज्यात दरवर्षी दिनांक २० नोव्हेंबर रोजी राष्ट्रीय आवास दिनाचे औचित्य साधून** राज्यात सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजना अधिक गतिमान करण्यासाठी व गुणवत्तावाढीसाठी महा आवास अभियान राबविले जाते. या आर्थिक वर्षामध्ये देखील '**महा आवास अभियान**' राबविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय :-**

“सर्वांसाठी घरे” या शासनाच्या धोरणांतर्गत अभियान कालावधीत विविध उपक्रम राबवून केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत रमाई आवास योजना, शबरी आवास योजना, पारधी आवास योजना, आदिम आवास योजना, अटल बांधकाम कामगार आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना, मोदी आवास घरकुल योजना या सर्व

ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी महाराष्ट्र राज्यात **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ या १०० दिवसांच्या कालावधीत "महा आवास अभियान २०२४-२५"** राबविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

## २. "महा आवास अभियान २०२४-२५" राबविण्याचे उद्देश्ये :-

i. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या कामास गतिमान करणे.

ii. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये शासकीय यंत्रणा व पंचायतराज संस्था यांचेबरोबरच समाजातील सर्व घटक जसे- स्वयंसेवी संस्था (लायन्स क्लब, रोटरी क्लब, इ.), सहकारी संस्था (साखर कारखाने, दुधसंघ, इ.), खासगी संस्था (Corporates), तंत्र शिक्षण संस्था (IITB, COEP, VNIT, इ.), बँका, लोकप्रतिनिधी, लाभार्थी, ग्रामस्थ, इ. भागधारकांचा सक्रीय सहभाग वाढविणे.

iii. राज्यात ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रातील भागधारकांची क्षमताबांधणी व जन-जागृतीद्वारे लोक चळवळ उभी करणे.

iv. ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा कृतिसंगम (Convergence) घडवून आणणे.

v. ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्रामध्ये नावीन्यपूर्ण उपक्रम राबवून घरांचा दर्जा व गुणवत्ता वाढविणे.

## ३. "महा आवास अभियान २०२४-२५" कालावधीत राबवावयाचे उपक्रम :-

### i. भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे:-

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, संमतीपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून उर्वरित सर्व भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे.

### ii. घरकुलांना उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी देणे:-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांनुसार १०० टक्के मंजूरी देणे आणि लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी लाभार्थी मेळाव्याचे आयोजन करून लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरीत वितरीत करणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करणे.**

### iii. मंजूर घरकुलांना हप्ते वेळेत वितरीत करणे:-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांना **पहिल्या**

**हप्त्याचे वितरण ७ दिवसांत करणे** व पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरित करणे. हे करतांना लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजन** करणे.

### iv. मंजूर घरकुले भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे:-

केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान व राज्य पुरस्कृत या सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. यामध्ये लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांच्या बैठका/मेळावे घेणे, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक/ग्राम विकास अधिकारी), ग्रामपंचायत कर्मचारी, महिला स्वयंसहाय्यता गट, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इ. यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देणे व मंजूर केलेली सर्व घरकुले गतीने व गुणवत्तापूर्वक पूर्ण करणे.

### v. प्रलंबित घरकुले (Delayed Houses) पूर्ण करणे:-

प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करणे. यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण व उपाययोजना करून सदर घरकुले पूर्ण करणे**. याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने '**लोक अदालत**' वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करणे व **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नवीन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेणे**.

### vi. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे:-

घरकुलांची दर्जेदार बांधकामासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून मूल्यमापनासह (Assessment) **त्वरित पूर्ण करुन घेणे**. तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय पॅनेल बनविणे व या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे.**

### vii. बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे:-

जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून, त्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करणे व त्यांच्या बहुमजली इमारती, **हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंट** द्वारे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यास प्रवृत्त करणे. अशा लाभार्थ्यांच्या राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** प्रत्येकी किमान एक याप्रमाणे **बहुमजली इमारती (G + 1 ते G + 4), हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंट** उभारणे.

### viii. डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे :-

घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत तालुका व जिल्हा स्तरावर डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. सदर डेमो हाऊसेसला लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आयोजित करुन ग्रामपंचायत स्तरावरील डेमो हाऊस मॉडेल लाभार्थ्यांस वेळोवेळी दाखवून त्याप्रमाणे त्यांच्या घरकुलांची कामे पूर्ण होण्यासाठी प्रभावीपणे वापर करणे. या व्यतिरिक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा **लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप (Co-op Shop) सुरु करणे.**

### ix. शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) करणे :-

सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ देणे (कृतीसंगम करणे). जसे - लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**, शौचालयासाठी **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण**, नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी **जल जीवन मिशन**, गॅस जोडणीसाठी **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**, विद्युत जोडणी साठी **सौभाग्य योजना**, उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन**, इ.

तसेच **अनुसुचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे** (ग्रामीण), **ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, महाऊर्जा जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी, हाऊसिंग अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे**, इ. उपलब्ध करुन देणे.

### x. नाविण्यपूर्ण उपक्रम (Innovations / Best Practices) राबविणे :

ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी पुढीलप्रमाणे नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे.

**१. लॅण्ड बँक** :- सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची '**लॅण्ड बँक**' तयार करणे.

**२. सॅण्ड बँक** :- सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे '**सॅण्ड बँक**' ची निर्मिती करणे.

**३. घरकुल मार्ट** :- राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक '**घरकुल मार्ट**' सुरू करून त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध करणे.

४. **गृहकर्ज** :- घरकुलांचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांच्या समन्वयातून गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ करणे.

५. **वाळूला पर्याय** :- क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून करणे.

६. **मॉडेल हाऊसेस** :- किमान १०% घरकुल बांधकामामध्ये फरशी/लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून '**मॉडेल हाऊसेस**' उभारणे. रंगरंगोटी करतांना शासनाचे पत्र क्र.जा.क्र.राव्यक-ग्रागृ/बांध/१४०/२०२१, दिनांक १८ मे, २०२१ रोजीच्या पत्रानुसार घरकुलांना रंगसंगती करणे.

७. **नवनवीन तंत्रज्ञान** :- किमान १०% घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान,किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर करणे.

**८. घरावर ग्रामीण गृहनिर्माण योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद इ. बाबींची पूर्तता करणे.**

९. **क्षेत्र अधिकारी ॲप** :- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी **क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer App) ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पाहणी करतांना या ॲपचा जास्तीत जास्त वापर करणे.

**१०. इतर नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे :-**

## ४. "महा आवास अभियान २०२४-२५" अंमलबजावणीसाठी क्षमताबांधणी कार्यक्रम :-

### "महा आवास अभियान २०२४-२५" राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळा :-

अभियानाचा शुभारंभ जानेवारी २०२५ च्या पहिल्या आठवड्यात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या शुभहस्ते, मा.उप मुख्यमंत्री, मा.मंत्री (ग्राम विकास), मा.मंत्री (महसूल, आदिवासी विकास, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य, इतर मागास व बहुजन कल्याण), मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, अतिरिक्त मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (महसूल विभाग, आदिवासी विकास विभाग, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग), प्रधान सचिव (ग्राम विकास व पंचायत राज विभाग), आयुक्त, (आदिवासी विकास, समाज कल्याण, कामगार), संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे उपस्थितीत राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजनाने करण्यात यावे.

या कार्यशाळेत सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा

परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात यावे.

### २) विभागस्तरीय कार्यशाळा:-

राज्यातील सर्व विभागांमध्ये **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते ०७ जानेवारी, २०२५ या कालावधीत** संबंधित विभागीय आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), अतिरिक्त आयुक्त/ उपायुक्त (आदिवासी विकास, सामाजिक न्याय, कामगार) व उपायुक्त (विकास) यांचे उपस्थितीत विभागस्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

या कार्यशाळांत प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ), जिल्हा माहिती अधिकारी, गट विकास अधिकारी, विभागीय कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. सदर कार्यशाळेस राज्यस्तरावरुन राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण कार्यालयाचे अधिकारी निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील.

### ३) जिल्हास्तरीय कार्यशाळा:-

राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये **दिनांक ०८ जानेवारी, २०२५ ते १४ जानेवारी, २०२५ या कालावधीत** मा.पालकमंत्री यांचे अध्यक्षतेखाली तसेच मा.अध्यक्ष, जिल्हा परिषद यांचे प्रमुख उपस्थितीत आणि मा. खासदार, मा. आमदार, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद), प्रकल्प संचालक (जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा), प्रकल्प अधिकारी (एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प), सहाय्यक आयुक्त (समाज कल्याण), उप जिल्हा कार्यकारी अधिकारी (महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ) यांच्या उपस्थितीत जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

या कार्यशाळांत जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती सभापती, उपसभापती, गट विकास अधिकारी, तहसिलदार, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, तालुकास्तरीय डाटा एन्ट्री ऑपरेटर, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इ. यांना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. सदर कार्यशाळेस विभागस्तरावरील अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील.

### ४) तालुकास्तरीय कार्यशाळा:-

राज्यातील जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये **दिनांक १५ जानेवारी, २०२५ ते २१ जानेवारी, २०२५** या कालावधीत तालुक्याचे मा. आमदार यांचे अध्यक्षतेखाली तसेच पंचायत समिती सभापती, उपसभापती, जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, गट विकास अधिकारी, तहसिलदार यांच्या उपस्थितीत तालुकास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

या कार्यशाळांत तालुक्यातील सर्व सरपंच, ग्रामसेवक, तलाठी, पंचायत समिती

कार्यालयातील संबंधित अधिकारी/कर्मचारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, बँक प्रतिनिधी, मिडीया प्रतिनिधी, इत्यादींना अभियानाबाबत मार्गदर्शन करण्यात येईल. सदर कार्यशाळेस जिल्हास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील.

### ५) ग्रामस्तरीय कार्यशाळा :-

राज्यात सर्वत्र **दिनांक २२ जानेवारी, २०२५ ते २८ जानेवारी, २०२५ या कालावधीत** गावस्तरावर सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामपंचायत सदस्य व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत **ग्रामस्तरीय कार्यशाळा** आयोजित करुन त्यामध्ये ग्रामसेवक, तलाठी हे अभियानाबाबत सखोल मार्गदर्शन करतील. या कार्यशाळाद्वारे **"महा आवास अभियान २०२४-२५"** चे यशस्वी अंमलबजावणीसाठी मिळालेली माहिती सर्व लाभार्थी यांना देवून गावातील गतिमान अंमलबजावणीबाबतचे नियोजन करण्यात येईल. सदर कार्यशाळेस तालुकास्तरावरील संपर्क अधिकारी हे निरीक्षक म्हणून उपस्थित राहतील.

### ६) ग्राम कृती गटाचे (Village Action Group) गठन:-

या ग्रामस्तरीय कार्यशाळेमध्ये प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये 'ग्राम कृती गटाचे गठन' करण्यात यावे. यामध्ये गावातील प्रभावी व्यक्ती, युवक/युवती, इत्यादींचा समावेश करता येईल. उदा. सरपंच, ग्रामसेवक, पोलीस पाटील, शिक्षक, पोलीस इ. प्रभावी व्यक्ती. या गटाने **"महा आवास अभियान २०२४-२५"** मध्ये गावस्तरावर केल्या जाणाऱ्या व करावयाच्या प्रत्यक्ष उपाय योजनांचा पाठपुरावा करुन अभियान १०० टक्के यशस्वी करावयाचे आहे.

### ७) लाभार्थी मेळावे :-

गावोगावी लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत वेळोवेळी लाभार्थ्यांचे मेळावे आयोजित करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम व दर्जाबाबत मार्गदर्शन करणे, प्रोत्साहन देणे, तसेच लाभार्थ्यांना घरकुल मंजूरी पत्र वितरण करणे, घरकुलाचे भूमिपूजन कार्यक्रम आयोजित करणे, घरकुलांचे हप्ते वितरण कार्यक्रम करणे, गृहप्रवेश कार्यक्रम करणे, इ. सारखे उपक्रम राबविणेत यावेत.

### ८) वित्तीय मेळावे:-

तालुकास्तरावर/ गावोगावी वित्तीय संस्थांच्या अधिकाऱ्यांच्या/ कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत घरासाठी कर्ज घेवू इच्छिणाऱ्या लाभार्थ्यांसाठी वित्तीय संस्था मेळाव्याचे आयोजन करुन लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी कर्ज उपलब्धतेसाठी प्रयत्न करण्यात यावेत. (बँक, स्वयं सहायता गट, ग्रामसंघ, प्रभागसंघ इ.)

## ५. "महा आवास अभियान २०२४-२५" चा प्रचार व प्रसिध्दीसाठी माहिती शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रम:-

'महा आवास अभियान २०२४-२५' अंतर्गत राज्यात राबविण्यात येणाऱ्या विविध घरकुल योजनांबाबत जन जागृती, प्रचार-प्रसिध्दी करण्यासाठी माहिती, शिक्षण व संवाद (IEC) च्या विविध उपक्रमांचा जसे- Mass मिडीया, Outdoor मिडीया, Social मिडीया, Group मिडीया, आंतरव्यक्ती संवाद (IPC), पारंपारिक मिडीया, इ. उपक्रमांचा यथोचित वापर करण्यात यावा.

## ६. अभियानाची प्रभावी अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन :-

"**महा आवास अभियान २०२४-२५**" च्या प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी राज्य, विभाग, जिल्हा, तालुका व गाव स्तरावर पुढीलप्रमाणे समित्या कार्यरत राहतील.

### I. राज्यस्तरीय अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन समिती :-

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज विभाग | अध्यक्ष |
| २ | अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग | सदस्य |
| ३ | अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, महसूल व वन विभाग | सदस्य |
| ४ | अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| ५ | अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, आदिवासी विकास विभाग | सदस्य |
| ६ | प्रधान सचिव, इतर मागास बहूजन कल्याण विभाग | सदस्य |
| ७ | प्रधान सचिव, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग | सदस्य |
| ८ | संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृह निर्माण | सदस्य सचिव |

### II. विभागस्तरीय अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन समिती :-

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय | अध्यक्ष |
| २ | अपर आयुक्त, आदिवासी विकास | सदस्य |
| ३ | अपर कामगार आयुक्त/ कामगार उपायुक्त | सदस्य |
| ४ | विभागीय उप आयुक्त, समाज कल्याण | सदस्य |
| ५ | उपआयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ६ | उपआयुक्त (पुरवठा), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य |
| ७ | विभागीय सह निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ८ | बँक क्षेत्रीय अधिकारी | सदस्य |
| ९ | उपआयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय | सदस्य सचिव |

### III. जिल्हास्तरीय अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन समिती :-

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | कार्यकारी अध्यक्ष, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | अध्यक्ष |
| २ | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प | सदस्य |
| ३ | सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण | सदस्य |
| ४ | उपजिल्हा कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळ | सदस्य |
| ५ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) | सदस्य |
| ७ | निवासी उप जिल्हाधिकारी | सदस्य |
| ८ | जिल्हा पुरवठा अधिकारी | सदस्य |
| ९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| १० | जिल्हा माहिती अधिकारी | सदस्य |
| ११ | जिल्हा लीड बँकर्स / बँक प्रतिनिधी | सदस्य |
| १२ | प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा | सदस्य सचिव |

### IV. तालुकास्तरीय अंमलबजावणी, सनियंत्रण व मूल्यमापन समिती :-

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती | अध्यक्ष |
| २ | तहसिलदार | सदस्य |
| ३ | तालुका सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था | सदस्य |
| ४ | उप अभियंता (बांधकाम), जिल्हा परिषद | सदस्य |
| ५ | उप अभियंता (पाणी पुरवठा), जिल्हा परिषद | सदस्य |
| ६ | विस्तार अधिकारी, पंचायत | सदस्य |
| ७ | स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक/ ग्रामीण गृहनिर्माण अभियंता | सदस्य |
| ८ | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान चे प्रतिनिधी | सदस्य |
| ९ | बँक प्रतिनिधी | सचिव |
| १० | विस्तार अधिकारी, संबंधित | सदस्य सचिव |

V. ग्रामपंचायतस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती :-

| अ.क्र. | पद | पदनाम |
|---|---|---|
| १ | सरपंच, ग्रामपंचायत | अध्यक्ष |
| २ | उप सरपंच, ग्रामपंचायत | सदस्य |
| ३ | ग्राम रोजगार सेवक, मनरेगा | सदस्य |
| ४ | तलाठी | सदस्य |
| ५ | महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी चे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान चे प्रतिनिधी | सदस्य |
| ७ | ग्राम विकास अधिकारी /ग्रामसेवक, ग्रामपंचायत | सदस्य सचिव |

वरील अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समित्या राज्यस्तर, विभागस्तर, जिल्हास्तर, तालुकास्तर व गावपातळीवरुन क्षमता बांधणी कार्यशाळा, आढावा बैठका, क्षेत्रिय भेटी (Field Visits), Awaas Soft, MIS Formats, इ. द्वारे अभियानाचे संनियंत्रन व मूल्यमापन करतील.

## ७. "महा आवास अभियान २०२४-२५" कालावधीतील उत्कृष्ट कार्याचा गौरव:-

**"महा आवास अभियान २०२४-२५"** मध्ये उत्कृष्ट काम करणाऱ्या संस्था व व्यक्तींना पुढीलप्रमाणे **"महा आवास अभियान पुरस्कार"** देऊन गौरविण्यात येईल. पुरस्काराचे स्वरुप, पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे वेळापत्रक इत्यादी बाबत स्वतंत्रपणे कळविण्यात येईल.

### अ. राज्यस्तरीय पुरस्कार :-

#### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट विभाग - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट हाऊसिंग कॉलनी व सर्वोत्कृष्ट हाऊसिंग अपार्टमेंट - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

#### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट विभाग - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
v. सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट हाऊसिंग कॉलनी व सर्वोत्कृष्ट हाऊसिंग अपार्टमेंट - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## ब. विभागस्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. नावीन्यपूर्ण उपक्रम सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट जिल्हे - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iv. नावीन्यपूर्ण उपक्रम सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## क. जिल्हास्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट तालुके - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट क्लस्टर - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## ड. तालुकास्तरीय पुरस्कार :-

### I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

### II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट क्लस्टर – प्रथम क्रमांक.
ii. सर्वोत्कृष्ट ग्रामपंचायत - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.
iii. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

इ. ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कार :-

I. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण

i. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

II. राज्य पुरस्कृत आवास योजना

i. सर्वोत्कृष्ट घरकुल - प्रथम, व्दितीय व तृतीय क्रमांक.

## ८. "महा आवास अभियान २०२४-२५" कालावधीत राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन:-

दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक १० एप्रिल, २०२५ हा अभियान कालावधी संपल्यावर अभियानात राबविण्यात आलेल्या उपक्रमांचे मूल्यमापन करण्यात येईल. या मूल्यमापनाच्या आधारे राज्य, विभाग, जिल्हा, तालुका, ग्रामस्तरावर उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने काढण्यात येतील. परिच्छेद ७ मध्ये नमूद विविध स्तरावरील उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने खालीलप्रमाणे समित्याव्दारे निवडण्यात येतील.

| पुरस्कार नामांकने | उत्कृष्ट कामासाठीच्या पुरस्कारांची नामांकने निवडण्यासाठी समित्या |
|---|---|
| राज्यस्तरीय पुरस्कारांची निवड | राज्यस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| विभागस्तरीय पुरस्कारांची निवड | विभागस्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| जिल्हास्तरीय पुरस्कारांची निवड | जिल्हास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| तालुकास्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |
| ग्रामपंचायतस्तरीय पुरस्कारांची निवड | तालुकास्तरीय अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापन समिती |

मूल्यूमापनाचे निकष सोबत 'परिशिष्ट –अ' व 'परिशिष्ट-ब' मध्ये देण्यात आले आहेत.

९. 'महा आवास अभियान २०२४-२५' अंमलबजावणीसाठीचा खर्च प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण व राज्य पुरस्कृत योजना यांच्या प्रशासकीय निधीतून करण्यात यावा.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in यासंकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०२५१०११६४५४५१४२० असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

## परिशिष्ट अ

## राज्य, विभाग, जिल्हा, तालुकास्तरीय पुरस्कार निवडीसाठीचे निकष

| अ. क्र. | राबविलेले उपक्रम | पारितोषिकासाठी निवडीचे निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दती (टक्केवारीच्या प्रमाणात गुण देण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| १. | भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे. | सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत गरजू, पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी जागा उपलब्ध नसलेल्या लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देण्यासाठी **पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**, शासकीय जागा विनामूल्य उपलब्ध करण्याची योजना, ग्रामीण भागातील अतिक्रमणे नियमानुकूल करण्याची योजना व इतर मार्ग – उदा. बक्षीसपत्र, भाडेपट्टा, इ. प्रभावीपणे राबवून उर्वरित सर्व भूमिहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करून देणे. | १० | एकूण पात्र व भूमीहीन लाभार्थ्यांपैकी किती लाभार्थ्यांना दिनांक ३१ मार्च, २०२४ ते अभियान समाप्तीपर्यतच्या कालावधीमध्ये जागा उपलब्ध करुन दिली, त्या प्रमाणात गुण देण्यात येतील. (उदा. ५०% भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन दिल्यास ५ गुण). |
| २. | घरकुलांच्या उद्दिष्टांप्रमाणे मंजूरी देणे. | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती न्याय महा अभियान व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत जिल्ह्यांना वितरित करण्यात आलेल्या घरकुल उद्दिष्टांनुसार १०० टक्के लाभार्थ्यांना मंजूरी देणे आणि लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी लाभार्थ्यांना **घरकुल मंजूरीचे पत्र** त्वरित वितरित करणे, घरकुलाचे काम तात्काळ सुरु करणेबाबत सूचना देणे, घरकुल बांधकामाबाबत तांत्रिक मार्गदर्शन करणे व भूमिपूजन कार्यक्रम करुन **घरकुलाचे बांधकाम सुरु करणे**. | १० | उद्दिष्टापैकी दिनांक ३१ मार्च, २०२४ ते अभियान समाप्तीपर्यतच्या कालावधीमध्ये मंजूरी दिलेल्या घरकुलांच्या प्रमाणात गुण देण्यात येतील. (उदा. ८०% घरकुलांना मंजूरी दिल्यास ८ गुण) |
| ३. | मंजूर घरकुलांना हप्ते वेळेत वितरित करणे. | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती न्याय महा अभियान व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांना **पहिल्या हप्त्याचे वितरण ७ दिवसांत करणे**. पुढील हप्ते घरकुलांच्या भौतिक प्रगतीनुसार विनाविलंब वितरित करणे. हे करतांना लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी स्थानिक स्तरावर **हप्ते वितरण कार्यक्रमाचे आयोजन** करणे. | १० | दिनांक ३१ मार्च, २०२४ ते अभियान समाप्तीपर्यतच्या कालावधीत भौतिक प्रगतीनुसार पूर्ण घरकुलांचे सर्व हप्ते वितरित केल्यास आर्थिकदृष्ट्या पूर्ण घरकुलांच्या प्रमाणात गुण देण्यात येतील. (उदा.५०% भौतिकदृष्ट्या पूर्ण घरकुलांचे हप्ते वितरित केल्यास ५ गुण) |

| अ. क्र. | राबविलेले उपक्रम | पारितोषिकासाठी निवडीचे निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दती (टक्केवारीच्या प्रमाणात गुण देण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| ४. | मंजूर घरकुले भौतिक दृष्ट्या पूर्ण करणे. | केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण, प्रधानमंत्री जनजाती न्याय महा अभियान व राज्य पुरस्कृत ग्रामीण गृहनिर्माण योजनांतर्गत मंजूर घरकुलांचे काम भौतिकदृष्ट्या पूर्ण करणे. यामध्ये लाभार्थ्यांच्या सक्रिय सहभागासाठी त्यांच्या बैठका/मेळावे घेणे, सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी (ग्रामसेवक/ ग्राम विकास अधिकारी), ग्रामपंचायत कर्मचारी, महिला स्वयंसहाय्य गट, अंगणवाडी कर्मचारी, आशा कर्मचारी, ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, इ. यांनी घरकुलांना वेळोवळी भेटी देणे व मंजूर केलेली सर्व घरकुले गतीने व गुणवत्तापूर्वक पूर्ण करणे. | २० | मंजूरी देण्यात आलेल्या घरकुलांपैकी दिनांक ३ १ मार्च, २०२४ ते अभियान समाप्तीपर्यतच्या कालावधीमध्ये भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेल्या घरकुलांच्या प्रमाणात गुण देण्यात येतील. ( उदा. मंजूरी देण्यात आलेल्या घरकुलांपैकी ५०% घरकुले पूर्ण झाल्यास १० गुण) |
| ५. | ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे. | घरकुलांच्या दर्जेदार बांधकामासाठी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत ग्रामीण गवंडी प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्दिष्ट हे प्रशिक्षण देणाऱ्या संस्था (Training Provider) यांच्याशी समन्वय ठेवून **मूल्यमापनासह** (Assessment) **त्वरित पूर्ण करुन घेणे** तसेच प्रशिक्षित ग्रामीण गवंडी व ग्रामपंचायत क्षेत्रातील इतर उपलब्ध गवंडी यांची ग्रामपंचायतनिहाय पॅनेल बनविणे व या **पॅनेलमधील गवंड्यांचा ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील घरकुलांच्या बांधकामात सहभाग घेणे.** | १० | दिनांक ३१ मार्च, २०२४ ते अभियान समाप्तीपर्यतच्या कालावधीत ग्रामीण गवंडी प्रशिक्षणासाठी दिलेल्या उद्दिष्टानुसार गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे ५ गुण व गवंडी प्रशिक्षण मुल्यांकनासहीत पूर्ण करणे ५ गुण या प्रमाणे एकूण १० गुण देण्यात येतील. (उदा. ग्रामीण गवंडी प्रशिक्षण ५०% पूर्ण झाल्यास २.५ गुण व गवंडी प्रशिक्षण मुल्यांकनासहीत ७०% पूर्ण झाल्यास ३.५ गुण या प्रमाणे). |
| ६. | बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंटची उभारणी करणे | जागांची कमतरता व जागांच्या किमती यांचा विचार करून कमी जागेत जास्त लाभार्थी सामावण्यासाठी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून, त्यांच्या एकत्रित निधीतून जागा खरेदी करणे व त्यांच्या बहुमजली इमारती, गृहसंकुले व अपार्टमेंट द्वारे घरांचे स्वप्न पूर्ण करण्यास प्रवृत्त करणे. अशा लाभार्थ्यांच्या राज्यात **प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये** किमान एक याप्रमाणे **बहुमजली इमारती** (G + 1 ते G + 4), **हाऊसिंग कॉलनी व हाऊसिंग अपार्टमेंट** उभारणे. | | उद्दिष्टापैकी दिनांक ३१ मार्च, २०२४ ते अभियान समाप्तीपर्यतच्या कालावधीमध्ये पूर्ण झालेल्या बहुमजली इमारती उभारणे साठी ३, गृहसंकुले उभारणेसाठी ४, हाऊसिंग अपार्टमेंट उभारणेसाठी ३ या प्रमाणे १० पैकी गुण देण्यात येतील. (उदा. बहुमजली इमारतीचे ५०% उद्दिष्ट पूर्ण झाल्यास १.५ गुण, गृहसंकुलाचे ५०% उद्दिष्ट पूर्ण झाल्यास २ गुण, हाऊसिंग अपार्टमेंटचे ५०% उद्दिष्ट पूर्ण झाल्यास १.५ गुण) |

| अ. क्र. | राबविलेले उपक्रम | पारितोषिकासाठी निवडीचे निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दती (टक्केवारीच्या प्रमाणात गुण देण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| ७. | डेमो हाऊसचा प्रभावी वापर करणे | घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत तालुका व जिल्हा स्तरावर डेमो हाऊसची निर्मिती करण्यात आली आहे. सदर डेमो हाऊसेसला लाभार्थ्यांच्या प्रत्यक्ष भेटी आयोजित करुन ग्रामपंचायत स्तरावरील डेमो हाऊस मॉडेल लाभार्थ्यांस वेळोवेळी दाखवून त्याप्रमाणे त्यांच्या घरकुलांचे काम पूर्ण होण्यासाठी प्रभावीपणे वापर करणे. या व्यतिरीक्त प्रत्येक डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा **लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी महिला स्वयंसहायता गट/ग्रामसंघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थांच्या सहकार्यातून कॉप-शॉप** (Co-op Shop) **सुरु करणे.** | १० | डेमो हाऊसेसच्या उद्दिष्टानुसार तालुकास्तरीय व जिल्हास्तरीय डेमो हाऊसमध्ये माहिती कक्ष किंवा लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी कॉप-शॉप, इ. सुरु केल्याच्या प्रमाणात गुण देण्यात येतील. (उदा. डेमो हाऊसच्या दिलेल्या उद्दिष्टापैकी ५०% डेमो हाऊसमध्ये लाभार्थी / महिला स्वयं सहायता गट यांच्या उत्पादनांच्या विक्रीसाठी कॉप-शॉप, माहिती कक्ष, इ. सुरु केल्यास ५ गुण) |
| ८. | शासकीय योजनांशी कृतीसंगम करणे. | सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेणे (कृतीसंगम करणे). जसे - लाभार्थ्यांना रोजगार मिळवून देण्यासाठी **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना**, शौचालयासाठी **स्वच्छ भारत मिशन-ग्रामीण**, नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणेसाठी **जल जीवन मिशन**, गॅस जोडणी साठी **प्रधानमंत्री उज्ज्वला योजना**, विद्युत जोडणी साठी **सौभाग्य योजना**, उपजिविकेचे साधन उपलब्ध करुन देणेसाठी **राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती मिशन**, इ.<br>तसेच **दलित वस्ती सुधार योजना, ठक्कर बाप्पा आदिवासी वस्ती सुधार योजना, महाऊर्जा, जिल्हा परिषद सेस, पंचायत समिती सेस, ग्राम पंचायत सेस, सीएसआर निधी** इ. च्या माध्यमातून लाभार्थ्यांची घरकुले, बहुमजली इमारती, हाऊसिंग कॉलनी, हाऊसिंग अपार्टमेंट यांना **मूलभूत नागरी सुविधा जसे जोडरस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज सिस्टीम, पथदिवे, इ. उपलब्ध करुन देणे.** | १० | नमूद शासकीय योजनांशी कृतीसंगम (Convergence) मधील १० बाबींसाठी प्रत्येकी १ गुण या प्रमाणे १० गुणांपैकी गुण देण्यात येतील. (उदा. जल जीवन मिशन मधून नळाने पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे उद्दिष्टापैकी ८०% उद्दिष्ट पूर्ण झाल्यास ०.८ गुण या प्रमाणे प्रत्येक बाबीसाठी १ पैकी गुण देऊन एकूण १० पैकी गुण देण्यात येतील.) |

| अ. क्र. | राबविलेले उपक्रम | पारितोषिकासाठी निवडीचे निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दती (टक्केवारीच्या प्रमाणात गुण देण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| ९. | नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे | ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या अंमलबजावणीमध्ये गतिमानता व गुणवत्ता आणण्यासाठी पुढीलप्रमाणे नावीण्यपूर्ण उपक्रम राबविणे.<br>**१.लॅण्ड बँक :-** सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमधील भूमिहीन लाभार्थ्यांनाघरकुल बांधकामाकरीता जागा उपलब्ध करुन देण्यासाठी ग्रामपंचायत स्तरावर विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची '**लॅण्ड बँक**' तयार करणे.<br>**२. सॅण्ड बँक** :-सर्व ग्रामीण गृहनिर्माणयोजनांमधील लाभार्थ्यांना घरकुल बांधकामाकरीता वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्हा परिषद गटात किमान एक याप्रमाणे '**सॅण्ड बँक**' ची निर्मिती करणे.<br>**३. घरकुल मार्ट** :- राज्यात महिला स्वयंसहायता गट/ग्राम संघ/प्रभाग संघ/विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था/ शेतकरी उत्पादक कंपनी, इ. समुदाय आधारीत संस्थाद्वारे प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक **घरकुल मार्ट** सुरू करून त्याद्वारे घरकुलाचे बांधकाम साहित्य जसे – दगड, विटा, वाळू, सिमेंट, दारे, खिडक्या, छताचे साहित्य, इ. विक्रीसाठी उपलब्ध करणे.<br>**४. गृहकर्ज** :- घरकुलांचे बांधकाम जलद गतीने पूर्ण करण्यासाठी वित्तीय संस्थांच्या समन्वयातून गरजेप्रमाणे इच्छुक लाभार्थ्यांना **गृहकर्ज** मिळवून देण्याची प्रक्रिया सुलभ करणे.<br>**५. वाळूला पर्याय** :- क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, फ्लाय ॲश ब्रिक्स, इंटर लॉकींग ब्रिक्स, हॉलो ब्रिक्स, इत्यादींचा वापर **वाळूला पर्याय** म्हणून करणे.<br>**६. मॉडेल हाऊसेस** :- किमान १०% घरकुल बांधकामामध्ये फरशी/ लादी, रंगरंगोटी, किचन गार्डन/परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ.चा वापर करून **मॉडेल हाऊसेस** उभारणे. रंगरंगोटी करतांना शासनाचे पत्र क्र.जा.क्र.राव्यक-ग्रागृ/बांध/१४०/२०२१, दिनांक १८ मे, २०२१ रोजीच्या पत्रानुसार घरकुलांना रंगसंगती करणे. | १० | नमूद नावीण्यपूर्ण उपक्रम अंमलबजावणी मधील १० बाबींसाठी प्रत्येकी १ गुण या प्रमाणे १० गुणांपैकी गुण देण्यात येतील. (उदा. **विविध मार्गांनी उपलब्ध होणाऱ्या जागांची 'लॅण्ड बँक' तयार करणे** उद्दिष्टापैकी ५०% उद्दिष्ट पूर्ण झाल्यास ०.५ गुण या प्रमाणे प्रत्येक बाबीसाठी १ पैकी गुण देऊन एकूण १० पैकी गुण देण्यात येतील.) |

| अ. क्र. | राबविलेले उपक्रम | पारितोषिकासाठी निवडीचे निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दती (टक्केवारीच्या प्रमाणात गुण देण्यात येतील) |
|---|---|---|---|---|
| ९. | नावीन्यपूर्ण उपक्रम राबविणे | ७. **नवनवीन तंत्रज्ञान** :- किमान १०% घरकुल बांधकामासाठी स्थानिक बांधकाम साहित्य, नवनवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्ती रोधक तंत्रज्ञान, इ. **नवनवीन तंत्रज्ञानाचा** वापर करणे.<br>**८. घरावर ग्रामीण गृहनिर्माण योजनेचा लोगो, पती पत्नीचे नाव व ग्रामपंचायतीच्या मालमत्ता नोंदवही मध्ये घरकुलाची नोंद इ. बाबींची पूर्तता करणे.**<br>९. **क्षेत्र अधिकारी ॲप** :- ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार यांनी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण ची प्रभावी अंमलबजावणी, संनियंत्रण व मूल्यमापनासाठी **क्षेत्र अधिकारी ॲप** (Area Officer App) ची निर्मिती केली आहे. ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या कामाची पहाणी करतांना या ॲपचा जास्तीत जास्त वापर करणे.<br>**१०. इतर नाविण्यपूर्ण उपक्रम राबविणे.** | | |
| | | **एकूण गुण** | **१००** | |
| १०. | प्रलंबित घरकुले (Delayed House) पूर्ण करणे. | प्रधानमंत्री आवास योजना- ग्रामीण अंतर्गत घरकुलांना पहिला हप्ता प्रदान केल्यापासून १२ महिन्यापेक्षा जास्त कालावधी झालेली, मात्र अद्यापपर्यंत अपूर्ण असलेली प्रलंबित घरकुले (Delayed Houses) प्राधान्याने पूर्ण करणे. यासाठी प्रलंबित घरकुलांच्या यादीनुसार घरकुले प्रलंबित राहण्यामागची कारणे शोधून त्या **कारणांचे विश्लेषण व उपाययोजना करून सदर घरकुले पूर्ण करणे**. याकामी गरजेप्रमाणे तालुका कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीच्या सहाय्याने **'लोक अदालत'** वा इतर मार्गाने लाभार्थ्यांना घरकुल पूर्ण करण्यासाठी प्रवृत्त करणे. तसेच पूर्ण होऊ न शकणारी प्रलंबित घरकुले प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीणच्या मार्गदर्शक सूचनांनुसार Refund करुन Remand करणे व **यापुढे प्रलंबित घरकुलांच्या यादीमध्ये नवीन घरकुलांचा समावेश होणार नाही याची दक्षता घेणे.** | -१० | अभियान संपताना Performance Index मध्ये असलेले निगेटिव्ह यास १० ने गुणून येणारे गुण एकूण गुणातून वजा करण्यात येतील. |

टिप :-

१. उपरोक्त सर्व अ.क्र.१ ते १० हे निकष प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीणसाठी लागू राहतील व अ.क्र. २ ते ४ व ८ ते ९ हे निकष राज्य पुरस्कृत आवास योजनांसाठी लागू राहतील.

२. उपरोक्त विवरणपत्रामधील उपक्रम क्र.१ भूमीहीन लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे व उपक्रम क्रमांक ५ ग्रामीण गवंडी प्रशिक्षण पूर्ण करणे या उपक्रमांमध्ये मध्ये जिल्ह्यामध्ये/ तालुक्यामध्ये/ग्रामपंचायतीमध्ये उद्दिष्ट उपलब्ध नसल्यास इतर उपक्रमांच्या गुणांची सरासरी काढून प्रत्येकी १० च्या प्रमाणात गुण देण्यात यावेत. (उदा. 'अ' जिल्ह्यामध्ये/ तालुक्यामध्ये/ग्रामपंचायतीमध्ये भूमीहीन लाभार्थी नसेल आणि त्या जिल्ह्याला/तालुक्यामध्ये/ग्रामपंचायतीला इतर ९ उपक्रमांमध्ये ९० गुणांपैकी ५० गुण मिळाले असल्यास उपक्रम क्र.१ साठी ५.५६ गुण देण्यात यावेत.)

## परिशिष्ट ब

## सर्वोत्कृष्ट घरकुल, सर्वोत्कृष्ट बहुमजली इमारत, सर्वोत्कृष्ट गृहसंकुल व सर्वोत्कृष्ट हाऊसिंग अपार्टमेंट निवडीचे निकष

| अ. क्र. | पारितोषिकासाठी निवडीचे निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दती |
|---|---|---|---|
| १. | नियोजन आराखडा, प्लास्टर, फरशी/लादी, किचन ओटा व रंगरंगोटी असलेले घरकुल. रंगरंगोटी करतांना शासनाचे पत्र क्र.जा.क्र.राव्यक-ग्राग्/बांध/१४०/२०२१, दिनांक १८ मे, २०२१ रोजीच्या पत्रानुसार घरकुलांना रंगसंगती करणे. | २० | नियोजन आराखडा, प्लास्टर, लादी, किचन ओटा, रंगरंगोटी असल्यास प्रत्येकी 4 गुण देण्यात यावेत. |
| २. | किमान कालावधीत पूर्ण केलेले घरकुल. | २० | भौतिकदृष्ट्या व आर्थिकदृष्ट्या किमान कालावधीत म्हणजे ६० दिवसात घरकुल पूर्ण केल्यास २० गुण, ९० दिवसासाठी १८ गुण, १२० दिवसासाठी १६ गुण याप्रमाणे दर वाढीव महिन्याला २ गुण कमी करण्यात यावेत. |
| ३. | शासकीय योजनांशी कृतीसंगम असलेले घरकुल. | २० | शासन निर्णयातील अ.क्र.३ (X) मध्ये शासकीय योजनांशी कृतीसंगम मधील नमूद ५ मुद्यांच्या आधारे प्रत्येकी ४ याप्रमाणे गुण देण्यात यावेत. |
| ४. | रेन वॉटर हार्वेस्टींग, किचन गार्डन/परसबाग, वृक्ष लागवड, सौरउर्जा साधने व नेट बिलींग, इ. सुविधा असलेले घरकुल. | २० | रेन वॉटर हार्वेस्टींग, किचन गार्डन/परसबाग, वृक्ष लागवड, सौरउर्जा साधने व नेट बिलींग यास प्रत्येकी ४ याप्रमाणे गुण देण्यात यावेत. |
| ५. | मूलभूत सुविधा (अंतर्गत रस्ता, ड्रेनेज व्यवस्था, इ), घरावर योजनेचा लोगो, लाभार्थ्यांचे (पती-पत्नी) नाव, ग्रामपंचायत प्रॉपर्टी रजिस्टरमध्ये नोंद, इ. | २० | मुलभूत सुविधा (अंतर्गत रस्ता, ड्रेनेज व्यवस्था, इ), घरकुलावर योजनेचा लोगो, लाभार्थ्यांचे (पती-पत्नीचे) नाव, ग्रामपंचायत प्रॉपर्टी रजिस्टरमध्ये नोंद, यास प्रत्येकी 5 याप्रमाणे गुण देण्यात यावेत. |
| | एकूण गुण | १०० | |

# प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीण

- **विभाग - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार**
- **शासन निर्णय** - दिनांक १ एप्रिल, २०१६ पासून प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण सुरू केली.
- **उद्देश** - "सर्वांसाठी घरे" ( Housing for All )
- **वैशिष्ट्ये** -
  - ग्रामीण भागातील कच्चे घर/ बेघर कुटुंबांना मुलभूत सुविधांसह घरकुलाचा लाभ देणे.
  - घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
  - घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२०लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
  - योजनेंतर्गत प्राप्त होणा-या उद्दिष्टाच्या ६०%उद्दिष्ट हे अनुसूचित जाती/ अनुसूचित जमाती (SC/ST),इतर (Others)-४०% प्रवर्गास वितरीत करण्यात येते आणि संपूर्ण उद्दिष्टाच्या ५% उद्दिष्ट दिव्यांग व्यक्तींसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे.
  - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार मार्फत विकसीत केलेल्या आवास सॉफ्ट AwaasSoft व Public Fund Management System (PFMS) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
  - आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण(Geo-Tagging) करण्यात येते.
  - ग्रामीण गवंडी प्रशिक्षण (Rural Mason Training) राबविण्याचे नियोजन केले आहे.
  - इच्छूक लाभार्थ्यांस योजनेंतर्गत बँकेकडून रु.७०,०००/- रक्कम कर्ज स्वरुपात मिळू शकते.
- **लाभार्थी निवड** -
  - ग्रामविकास व जलसंधारण विभागाकडील पत्र प्रआयो-जी-२०१६ /प्र.क्र.२०३/योजना-१० दिनांक ०१/०८/२०१६ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सामाजिक, आर्थिक व जात सर्व्हेक्षण (SECC-२०११) व सन २०१८-१९ च्या सर्वेक्षणाच्या माहितीच्या आधारे ग्रामसभेमार्फत तयार केलेल्या कायमस्वरुपी प्रतिक्षा यादी (PWL) मधून लाभार्थ्यांची निवड करण्यात येते.
  - लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- **अर्थसहाय्य** -
  - केंद्र व राज्य निधी वाटपाचे प्रमाण **६०:४०** असे आहे.
  - योजनेच्या राज्यस्तरीय बँक खात्यातून (State Nodal Account) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे Direct Benefit Transfer (DBT) योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
  - घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN)

- **विभाग** - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार
- **केंद्र शासन निर्णय** - १५ नोव्हेंबर, २०२३ रोजी जनजाती गौरव दिनाचे औचित्य साधून प्रधानमंत्री-जनजाती आदिवासी न्याय महा अभियान (PM-JANMAN) राबवण्याची घोषणा.
- **उद्देश** - "सर्वांसाठी घरे" (Housing for All)
- **वैशिष्ट्ये** -
  - ग्रामीण भागातील कच्चे घर/ बेघर कुटुंबांना मुलभूत सुविधांसह घरकुलाचा लाभ देणे.
  - घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
  - घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. २.०० लक्ष अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
  - कोलाम, कातकरी व माडीया गोंड या तीन आदीम जमाती करीता योजना.
  - ग्रामीण विकास मंत्रालय, भारत सरकार मार्फत विकसीत केलेल्या आवास सॉफ्ट AwaasSoft व Public Fund Management System (PFMS) प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
  - आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
  - ग्रामीण गवंडी प्रशिक्षण (Rural Mason Training) राबविण्याचे नियोजन करण्यात आले आहे.
  - इच्छूक लाभार्थ्यांस योजनेंतर्गत बँकेकडून रु. ७०,०००/- रक्कम कर्ज स्वरुपात मिळू शकते.
- **लाभार्थी निवड** -
  - ग्रामविकास व पंचायत राज विभागाने प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान (PM-JANMAN) अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी घरकुल योजनेअंतर्गत सर्वेक्षणाच्या माध्यमातून लाभार्थ्यांची निवड.
  - लाभार्थ्याचे कच्चे घर असावे.
  - लाभार्थी शासकीय नोकरीत नसावा.
- **अर्थसहाय्य** -
  - केंद्र व राज्य निधी वाटपाचे प्रमाण **६०:४०** असे आहे.
  - योजनेच्या राज्यस्तरीय बँक खात्यातून (State Nodal Account) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय **निधी** AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे Direct Benefit Transfer (DBT) **योजनेंतर्गत वितरित करण्यात येतो.**
  - घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# रमाई आवास योजना

- **विभाग - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
- **शासन निर्णय -**
  - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दि. १५ नोव्हेंबर, २००८ च्या शासन निर्णयान्वये राज्यात अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना जाहीर करण्यात आली.
  - शासन निर्णय दि.९ मार्च, २०१० अन्वये घरकुल योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु झाली.
  - शासन निर्णय दि. १९ नोव्हेंबर, २०११ अन्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना या योजनेस **'रमाई आवास योजना'** असे नाव देण्यात आले.
- **उद्देश** - राज्यातील अनुसूचित जाती (SC) व नवबौध्द घटकांसाठी घरकुल योजना
- **वैशिष्ट्ये -**
  - १००% राज्य पुरस्कृत योजना
  - घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
  - घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्यअनुज्ञेय आहे.
  - अनुसूचित जाती संवर्गातील ५% घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव.
  - AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
  - आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण(Geo-Tagging) करण्यात येते.
  - सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे.
- **लाभार्थी निवड -**
  - सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील दि. ३० सप्टेंबर २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये, लाभार्थी निवड निकष निश्चित करण्यात आलेले आहेत.
  - लाभार्थ्यांची निवड शासन निर्णयातील निकषांनुसार, ग्रामसभेमार्फत करण्यात येते. सदर यादीगट विकास अधिकारी यांच्यामार्फत अंतिम मंजूरीसाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात येते.
  - लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायम स्वरूपी प्रतीक्षा यादी (**PWL**) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- **अर्थसहाय्य -**
  - **सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो.**
  - राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरित करण्यात येतो.
  - घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# शबरी आवास योजना

- **विभाग** - आदिवासी विकास विभाग
- **शासन निर्णय** - आदिवासी विकास विभागाकडील, दि. 28 मार्च 2013 रोजीच्या शासन निर्णयान्वये अनुसूचित जमातीच्या पात्र लाभार्थ्यांना घरकूल देणेकरिता '**शबरी आवास योजना**' राबविणेत येते.
- **उद्देश** - राज्यातील अनुसूचित जमाती (ST) घटकांसाठी घरकुल योजना.
- **वैशिष्ट्ये** -
  - १००% राज्य पुरस्कृत योजना.
  - घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
  - घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
  - अनुसूचित जमाती संवर्गातील **५%** घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव.
  - AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात येतो.
  - आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परीक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
  - सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे.
- **लाभार्थी निवड** -
  - आदिवासी विकास विभागाकडील, दि.१५ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामाजिक, आर्थिक जात सर्वेक्षण नुसार लाभार्थी निवड करण्यात येते.
  - लाभार्थ्यांची निवड शासन निर्णयातील निकषांनुसार, ग्रामसभेमार्फत करण्यात येते. सदर यादीगट विकास अधिकारी यांच्यामार्फत अंतिम मंजूरीसाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात येते.
  - लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (**PWL**) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- **अर्थसहाय्य** -
  - **आदिवासी विकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो.**
  - राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
  - घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

आदिवासी विकास विभाग
महाराष्ट्र शासन

# पारधी आवास योजना

❖ **विभाग** - आदिवासी विकास विभाग.

❖ **शासन निर्णय** -

➢ आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय दि.२७ मे २०१६ नुसार "पारधी विकास कार्यक्रमाखाली" मंजूर केलेली घरकुले "**शबरी आदिवासी घरकुल योजना**" निकषानुसार बांधणेत येतात.

❖ **उद्देश** - राज्यातील पारधी समाजातील घटकांसाठी घरकुल योजना.

❖ **वैशिष्ट्ये** -

➢ १००% राज्य पुरस्कृत योजना.

➢ घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.

➢ घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.

➢ अनुसूचित जमाती पारधी संवर्गातील **५%** घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव.

➢ AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.

➢ आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.

➢ सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे.

❖ **लाभार्थी निवड** -

➢ आदिवासी विकास विभागाकडील, दि.१५ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामाजिक, आर्थिक जात सर्वेक्षण नुसार लाभार्थी निवड करावी.

➢ लाभार्थ्यांची निवड शासन निर्णयातील निकषांनुसार, ग्रामसभेमार्फत करण्यात येते. सदर यादीगट विकास अधिकारी यांच्यामार्फत अंतिम मंजूरीसाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात येते.

➢ ग्रामसभेने निवड केलेल्या पारधी समाजातील लाभार्थ्यांची अंतिमत: निवड दि.**२८** मार्च **२०१३** च्या शासन निर्णयानुसार ग्रामीण क्षेत्राकरीता स्थापन केलेली घरकुल निर्माण समिती गठीत करणेत आली आहे.

➢ लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (**PWL**) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

❖ **अर्थसहाय्य** -

➢ **आदिवासी विकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो.**

➢ राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक/पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.

➢ घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# आदिम आवास योजना

- **विभाग** - आदिवासी विकास विभाग
- **शासन निर्णय** -
  - आदिवासी विकास विभागाकडील शासन निर्णय दि.३१ मार्च २०१६ अन्वये सदर योजनेची अंमलबजावणी राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण मार्फत करण्यात येते.
  - आदिवासी विकास विभागाकडील, शासन निर्णय दि.७ फेब्रुवारी, २०१७ अन्वये आदिम जमाती विकास कार्यक्रमाखाली मंजूर केलेली घरकुले शबरी आदिवासी घरकुल योजने करिता निश्चित केलेल्या निकषानुसार बांधण्यात येतात.
- **उद्देश** - राज्यातील कातकरी, माडिया गोंड व कोलाम जमातीसाठी घरकुल योजना
- **वैशिष्ट्ये** -
  - १००% राज्य पुरस्कृत योजना
  - घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
  - घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
  - अनुसूचित जमाती आदिम संवर्गातील ५% घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव.
  - AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात येतो.
  - आवास ॲपमार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
  - सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे.
- **लाभार्थी निवड** -
  - आदिवासी विकास विभागाकडील, दि. १५ मार्च २०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये सामाजिक, आर्थिक जात सर्वेक्षण नुसार लाभार्थी निवड करावी.
  - लाभार्थ्यांची निवड शासन निर्णयातील निकषांनुसार, ग्रामसभेमार्फत करण्यात येते. सदर यादी गट विकास अधिकारी यांच्यामार्फत अंतिम मंजूरीसाठी जिल्हास्तरीय समितीकडे पाठविण्यात येते.
  - ग्रामसभेने निवड केलेल्या पारधी समाजातील लाभार्थ्यांची अंतिमत: निवड दि.२८ मार्च २०१३ च्या शासन निर्णयानुसार ग्रामीण क्षेत्राकरीता स्थापन केलेली घरकुल निर्माण समिती गठीत करणेत आली आहे.
  - लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (**PWL**) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
- **अर्थसहाय्य** -
  - आदिवासी विकास विभागामार्फत निधी उपलब्ध करुन दिला जातो.
  - राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
  - घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना

❖ **विभाग** - विजाभज, इमाव व विमाप्र विभाग

❖ **शासन निर्णय** - विजाभज, इमाव व विमाप्र विभागाकडील शासन निर्णय दिनांक २४/०१/२०१८ रोजीच्या अन्वये राज्यात लागू करण्यात आली आहे.

❖ **उद्देश** - विमुक्त जाती भटक्या जमाती या प्रवर्गातील समाजासाठी घरकुल योजना.

❖ **वैशिष्ट्ये** -

- १००% राज्य पुरस्कृत योजना
- योजनेंतर्गत शासकीय जमीन उपलब्ध होत असल्यास किमान १० कुटुंबासाठी सामूहिक योजना राबवून त्यामध्ये रमाई आवास योजनेच्या धर्तीवर प्रति लाभार्थी घर बांधण्यास आणि सदरहू वसाहतीला पाणी पुरवठा, वीज पुरवठा, सेफ्टीक टँक, गटारासह अंतर्गत रस्ते इत्यादी नागरी सुविधा पुरविण्यासाठी प्रती वसाहत रु. ४४.३१ लक्ष इतका आणि पुढील पात्र १० कुटुंबासाठी त्याप्रमाणात लाभार्थीनिहाय निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.
- घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
- घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
- AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात येतो.
- आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलिक परीक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
- वैयक्तिक लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर लाभ देण्यात येतो.

❖ **लाभार्थी निवड** -

- विमाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील, दि.२४ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करण्यात येते.
- लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (**PWL**) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

❖ **अर्थसहाय्य** -

- विमाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालयाकडून यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेस निधी उपलब्ध करुन दिला जातो.
- योजनेंतर्गत **१०** लाभार्थ्यांच्या वसाहतीकरीता रक्कम रु. ४४.३१ लक्ष विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येतात.
- राज्यस्तरीय बँक खात्यातून (**SNA**) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी **AwaasSoft** व **PFMS** प्रणालीद्वारे **DBT** योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
- घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना

❖ **विभाग** - इमाव, सावशैमाप्र, विजाभज, विमाप्र कल्याण विभाग

❖ **शासन निर्णय** - इमाव, सावशैमाप्र, विजाभज, विमाप्र कल्याण विभागामार्फत दि. ०६.०९.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये '**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजना**(**ग्रामीण**)' राज्यात लागू करण्यात आली.

❖ **उद्देश** - राज्यातील ग्रामीण भागातील धनगर समाजातील लोकांकरिता घरकुल योजना.

❖ **वैशिष्ट्ये** -

- ➢ १००% राज्य पुरस्कृत योजना
- ➢ घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
- ➢ घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
- ➢ AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
- ➢ आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
- ➢ वैयक्तिक लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर लाभ देण्यात येतो.

❖ **लाभार्थी निवड** -

- ➢ विमाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभागाकडील, दि.२४ जानेवारी, २०१८ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करण्यात येते.
- ➢ लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायमस्वरूपी प्रतीक्षा यादी (**PWL**) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

❖ **अर्थसहाय्य** -

- ➢ विमाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालयाकडून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर आवास योजनेस निधी उपलब्ध करुन दिला जातो.
- ➢ राज्यस्तरीय बँक खात्यातून (**SNA**) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी **AwaasSoft** व **PFMS** प्रणालीद्वारे **DBT** योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
- ➢ घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# मोदी आवास घरकुल योजना

❖ **विभाग** - इतर मागास बहुजन कल्याण विभाग.

❖ **शासन निर्णय** - इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडील शासन निर्णय दि. २८.०७.२०२३ रोजीच्या अन्वये राज्यात लागू करण्यात आली आहे.

❖ **उद्देश** - इतर मागास, विशेष मागास प्रवर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती या समाजासाठी घरकुल योजना.

❖ **वैशिष्ट्ये** -

- १००% राज्य पुरस्कृत योजना
- घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
- घरकुल बांधकामाकरिता साधारण क्षेत्रात रु. १.२० लक्ष व नक्षलग्रस्त/डोंगराळ लाभार्थ्यांना रु. १.३० लक्ष प्रति लाभार्थी अर्थसहाय्य अनुज्ञेय आहे.
- योजनेच्या पात्र लाभार्थ्यांपैकी इतर मागास प्रवर्गातील ५%घरकुले अपंग लाभार्थ्यांसाठी राखीव.
- AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरित करण्यात येतो.
- आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलिक परीक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
- सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना – ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे.

❖ **लाभार्थी निवड** -

- इतर मागास बहुजन कल्याण विभागाकडील, दि.२८ जुलै, २०२३ व १० जून २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये लाभार्थी निवड करण्यात येते.
  १. आवास प्लस मधील प्रतीक्षा यादीत नाव असलेले लाभार्थी.
  २. आवास प्लस प्रणालीवर नोंद झालेले परंतु automatic system द्वारे reject झालेले पात्र लाभार्थी.
  ३. जिल्हा निवड समितीने शिफारस केलेले लाभार्थी.
- उपरोक्त 1,2 व 3 मध्ये समाविष्ट असलेल्या इतर मागास प्रवर्गातील पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्यात येतो.

❖ **अर्थसहाय्य** -

- इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत निधी उपलब्ध करून दिला जातो.
- राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft **व** PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.
- घरकुल अनुदाना व्यतिरिक्त स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) (SBM) अंतर्गत पात्र लाभार्थ्यास रु.१२,०००/- शौचालय बांधकामासाठी प्रोत्साहनपर अनुदान व मनरेगा (MGNREGA) अंतर्गत ९० इतक्या अकुशल मनुष्य दिवसांची मजूरी (साधारणपणे रु.२६,७३०/-) देण्यात येते.

# अटल बांधकाम कामगार आवास योजना

❖ **विभाग** - उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग

❖ **शासन निर्णय** - उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत दि. १४.०१.२०१९ रोजीच्या शासन निर्णयान्वये '**अटल बांधकाम कामगार आवास योजना (ग्रामीण)**' राज्यात लागू करण्यात आली.

❖ **उद्देश** - राज्यातील ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रिय) बांधकाम कामगारांसाठी घरकुल योजना.

❖ **वैशिष्ट्ये** -

- १००% राज्य पुरस्कृत योजना
- घरकुलाचे २६९ चौ.फू.चटई क्षेत्रात स्वयंपाक घर व शौचालयासह बांधकाम अपेक्षित.
- योजनेंतर्गत प्रति घरकुल रु. १.५० लक्ष इतके अर्थसहाय्य देण्यात येते.
- AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
- आवास ॲप मार्फत घरकुल बांधकामाचे भौगोलीक परिक्षण (Geo-Tagging) करण्यात येते.
- सदर योजना प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीणच्या धर्तीवर राबविण्यात येत आहे.

❖ **लाभार्थी निवड** -

- महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांपैकी ग्रामीण भागातील नोंदीत (सक्रीय) बांधकाम कामगारांसाठीच्या अटल बांधकाम कामगार आवास योजनेचा (ग्रामीण) अंतर्गत केलेल्या अर्जाच्या छाननी करण्यासाठी अपर कामगार आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय लाभार्थी निवड समिती गठीत करण्यात आली आहे.
- लाभार्थ्यांची तालुकानिहाय यादी विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना उपलब्धकरुन देण्यात येते.
- लाभार्थी, प्रआयो-ग्रा अतंर्गत कायम स्वरूपी प्रतीक्षा यादी (PWL) बाहेरील असावा व लाभार्थी कुटुंबाने महाराष्ट्र राज्यात कोठेही घरकुल योजनेचा लाभ घेतलेला नसावा.

❖ **अर्थसहाय्य** -

- उद्योग, ऊर्जा व कामगार विभागामार्फत अटल बांधकाम कामगार आवास योजनेस निधी उपलब्ध करुन दिला जातो.
- राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.

# पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना

- **विभाग** - ग्रामविकास विभाग.
- **शासन निर्णय** -
  - ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दि.१४.०७.२०१७ अन्वये '**पंडित दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना**' राबविण्यात येते.
  - ग्राम विकास विभागाकडील शासन निर्णय दि. ०२/०८/२०१८ अन्वये योजनंतर्गत ग्रामीण भागातील शासकीय जमिनी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात येते.
  - ग्राम विकास विभागाकडील शासन निर्ण दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४ अन्वये योजने अंतर्गत अनुदान वाढ.
- **उद्देश** - केंद्र व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत घरकुलास पात्र परंतु घरकुल बांधकामासाठी भूमीहीन लाभार्थ्यांस जागा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देणे.
- **वैशिष्ट्ये** -
  - १००% राज्य पुरस्कृत योजना
  - योजनेंतर्गत घरकुल बांधकामासाठी भूमीहीन लाभार्थ्यांस ५०० चौ. फूट पर्यंत जागा खरेदी करण्यासाठी अर्थसहाय्य देण्यात येते.
  - प्रत्यक्ष जागेचे क्षेत्रफळ हे प्रति लाभार्थी ५०० चौ.फू. पर्यंत असल्यास प्रत्यक्ष जागेची किंमत किंवा रुपये ५०,०००/- एवढे होते.दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२४ च्या शासन निर्णयाने सदर रक्कम रु.१,००,०००/- करण्यात आली आहे.
  - मोठ्या ग्रामपंचायती/ शहराशेजारील ग्रामपंचायतीमध्ये स्थानिक प्राधिकरणाच्या नियमावलीनुसार २ मजली (G+१)/ ३ मजली (G+४) इमारतींच्या भूखंडासाठी प्रति लाभार्थ्यांस अर्थसहाय्य देण्यात येते.
  - जिल्हाधिकारी व शासनाकडून उपलब्ध झालेल्या शासकीय /संपादित जागा आणि ग्राम पंचायत अंतर्गत गावठाण हद्दीत येणारी जागा विनामूल्य उपलब्ध करण्यात येते.
  - AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे लाभार्थ्यांना निधी वितरीत करण्यात येतो.
- **लाभार्थी निवड** -
  - प्रधानमंत्री आवास योजना व राज्य पुरस्कृत ग्रामीण घरकुल योजनांतर्गत ज्या पात्र लाभार्थ्यांस घरकुल बांधकामासाठी स्वतःची जागा उपलब्ध नाही, अशा लाभार्थ्यांस निवड करण्यात येते.
  - लाभार्थी निवडीसाठी गट विकास अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली तालुकास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे.
- **अर्थसहाय्य** -
  - ग्राम विकास विभागामार्फत पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजनेस निधी उपलब्ध करुन दिला जातो.
  - राज्यस्तरीय बँक खात्यातून (SNA) लाभार्थ्यांच्या बँक /पोस्ट खात्यामध्ये टप्पानिहाय निधी AwaasSoft व PFMS प्रणालीद्वारे DBT योजनेंतर्गत वितरीत करण्यात येतो.

# विभागनिहाय घरकुल डिझाईन्स



कोकण विभाग



पुणे विभाग



नाशिक विभाग



छत्रपती संभाजी नगर विभाग



अमरावती विभाग



नागपूर विभाग

# बहुमजली इमारती डिझाईन्स (G+1 आणि G+2)





## हाऊसिंग कॉलनी डिझाईन



## हाऊसिंग अपार्टमेंट डिझाईन



# प्रधानमंत्री आवास योजनेतील भूमिहीन लाभार्थांच्या जागेची समस्या सोडविण्यासाठीचे नाविन्यपुर्ण उपक्रम

## बहुमजली इमारती (G+1 ते G+4)

- जमिनीची वाढती किंमत लक्षात घेऊन भूमिहीन लाभार्थी एकत्र येऊन बहुमजली इमारती बांधण्यासाठी प्रवृत्त करणे
- जागा व बांधकाम खर्चात बचत
- राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक बहुमजली इमारत उभारणे





## गृहसंकुले (Housing Colonies)

- जमिनीची वाढती किंमत लक्षात घेऊन भूमिहीन लाभार्थ्यांना एकत्र येऊन गृहसंकुल बांधण्याचा प्रवृत्त करणे
- जागा व बांधकाम खर्चात बचत
- राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान एक गृहसंकूल उभारणे



## बहुमजली गृहसंकुले (Housing Apartments)

- जमिनीची वाढती किंमत लक्षात घेऊन भूमिहीन लाभार्थ्यांनी एकत्र येऊन बहुमजली गृहसंकुले बांधण्यास प्रवृत्त करणे
- जागा व बांधकाम खर्चात बचत
- राज्यात प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक बहुमजली गृहसंकूल उभारणे



## लॅण्ड बँक

- ग्रामपंचायतस्तरावर विविध प्रकारे जमीन उपलब्ध होऊ शकण्याचा प्लॅन म्हणजे लॅण्ड बँक.
- या प्लॅन प्रमाणे सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांमध्ये भूमिहीन लाभार्थ्यांना घरकुल बांधणीसाठी जमीन उपलब्ध करून देणे.
- राज्यातील उर्वरीत ग्रामपंचायतीमध्ये लँड बँक उभारणे.



## अन्य प्रस्तावित उपाययोजना

- राज्यातील इंदिरा आवास मधील जुन्या वसाहतींचा /जागांचा उपयोग करणे.
- राज्यातील पाटबंधारे विभागाच्या वापरात नसलेल्या वसाहतींचा / जागांचा उपयोग करणे
- राज्यातील खासगी कंपन्यांच्या कामगार वसाहतींचा / जागांचा उपयोग करणे
- राज्यातील आदिवासी आश्रम शाळांच्या जमिनीचा उपयोग करणे
- राज्यातील ट्रायसेम ट्रेनिंग सेंटर च्या इमारती / जागांचा उपयोग करणे





# प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांची घरकुले गतीने पुर्ण होण्यासाठीचे नाविन्यपुर्ण उपक्रम

## घरकुल मार्ट

- दगड, वीट, वाळू, सिमेंट, स्टील, छत बांधकामाचे तसेच इतर बांधकाम साहित्य एकाच छताखाली आणि गावात किंवा गावाच्याजवळ अल्प दरात उपलब्ध करून देणे हा मुख्य उद्देश
- महिला बचत गटांचा सक्रीय सहभाग
- राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान १ घरकुल मार्ट सुरू करणे.




## सॅण्ड बँक

- सर्व ग्रामीण गृहनिर्माण योजनांच्या लाभार्थ्यांना घर बांधणीसाठी वाळू उपलब्ध करून देण्यासाठी सॅण्ड बँक तयार करणे
- वाळूस पर्याय -क्रश सॅण्ड, सिमेंट ब्लॉक, हॉलो ब्लॉक इंटरलॉकींग ब्रिक्स,, फ्लाय ॲश ब्रिक्स इ. चा वापर करणे.
- राज्यात प्रत्येक जिल्हा परिषद गटामध्ये किमान १ सँड बँक सुरू करणे.




## तालुकास्तरीय डेमो हाऊस

- लाभार्थ्यांना घरकुल बांधकाम करण्यासाठी मार्गदर्शक
- नैसर्गिक आपत्तीपासून संरक्षण करण्यास सक्षम, कमी खर्चात उच्च दर्जाचे आणि पर्यावरण पूरक बांधकाम
- लाभार्थ्यांना भेट देण्यासाठी प्रात्यक्षिक घरकुल
- या डेमो हाऊसेसला ४०६८८१ लाभार्थ्यांची प्रत्यक्ष भेट
- राज्यात ३५१ तालुकास्तरीय डेमो हाऊसेस उभारणे






# प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांची घरकुले गतीने पुर्ण होण्यासाठीचे नाविन्यपुर्ण उपक्रम

## जिल्हास्तरीय डेमो हाऊस

- घरकुलांची गुणवत्ता सुधारण्यासाठी व लाभार्थ्यांना मार्गदर्शक ठरण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत जिल्हा डेमो हाऊस निर्मिती
- स्थानिक भौगोलिक परिस्थिती, सामाजिक-सांस्कृतिक परिस्थिती तसेच स्थानिक पातळीवर उपलब्ध बांधकाम साहित्याचा विचार करुन राज्यामध्ये एकूण ३४ जिल्हास्तरीय डेमो हाऊस उभारणे










## मुलभूत नागरी सुविधा

- राज्यातील बहुमजली इमारती,गृहसंकुले आणि बहुमजली गृहसंकुलांना मुलभूत नागरी सुविधा जसे – जोड रस्ते, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, पथदिवे, रेन वॉटर हार्वेस्टिंग, सोलर पॅनल इ. पुरविणे
- शासकीय योजना, पंचायत राज संस्था, स्वयंसेवी संस्था, कॉर्पोरेटस CSR निधी उपलब्ध करणे









## आधुनिक बांधकाम तंत्रज्ञानयुक्त घरे

- जिल्ह्याच्या एकूण घराच्या उद्दिष्टापैकी किमान १०% घरे स्थानिक पातळीवर उपलब्ध साहित्य, नवीन बांधकाम तंत्रज्ञान, किफायतशीर बांधकाम तंत्रज्ञान, नैसर्गिक आपत्तीरोधक तंत्रज्ञान, इत्यादीचा वापर करून मॉडेल घरकुले बांधणे



## मॉडेल घरकुले

- जिल्ह्याच्या एकूण घराच्या उद्दिष्टापैकी किमान १०% घरकुलांमध्ये बांधकामामध्ये फरशी / लादी, रंगरंगोटी, किचन/टॉयलेट टाईल्स, किचन गार्डन / परसबाग, रेन वॉटर हार्वेस्टींग, सौरउर्जा साधने इ. चा वापर करून मॉडेल घरकुले बांधणे








अमृत महा आवास अभियान २०२२-२३ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री व सद्याचे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य श्री.देवेंद्र फडणवीस उपस्थितांना मार्गदर्शन करतांना



महा आवास अभियान २०२३-२४ राज्यस्तरीय शुभारंभ कार्यशाळे प्रसंगी तत्कालीन मा.मंत्री, ग्राम विकास व पंचायत राज श्री.गिरीष महाजन यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत राज्यस्तरीय महा आवास अभियान पुरस्कार वितरित



मा.प्रधान सचिव, ग्राम विकास व पंचायत राज श्री.एकनाथ डवले यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत महा आवास अभियान २०२४-२५ विभागस्तरीय शुभारंभ कार्यशाळा विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे येथे संपन्न




मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता, श्री. गुलाबराव पाटील यांच्या शुभहस्ते व इतर मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत जळगाव येथे महा आवास अभियान २०२४-२५ जिल्हास्तरीय कार्यशाळा शुभारंभ

# महाराष्ट्र शासनाचा एकच ध्यास,
# राज्यातील सर्वांसाठी आवास

## राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण

- प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण
- रमाई आवास योजना
- शबरी आवास योजना
- पारधी आवास योजना
- आदिम आवास योजना
- अटल बांधकाम कामगार आवास योजना
- यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर घरकुल योजना
- मोदी आवास घरकुल योजना
- पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकुल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना
- प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियान


**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष - ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**

४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापूर, नवी मुंबई - ४००६१४

Email ID : directoriayruralhousing@gmail.com

दुरध्वनी क्र. : ०२२-२७५६१८२४